## आदेश

साक्षीदाराने शपथेवर त्याच्या सरतपासाचे शपथपत्रातील संपूर्ण मजकूर खरा व बरोबर असून त्याचे सांगण्याप्रमाणे त्यांच्या विधिज्ञांनी तयार करुन त्याने वाचून त्यावर स्वाक्षरी केली असल्याचे सांगितले. सबब वाचून दाखल.

RANJANA GOVIND KUMBHAR
Digitally signed by RANJANA GOVIND KUMBHAR
Date: 2023.07.12 10:43:10 +0530

दि. ११/०७/२०२३

(श्रीमती आर. जी. कुंभार)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
सावंतवाडी.

**फिर्यादी तर्फे जादा सरतपास शपथेवर सुरु..**
**फिर्यादी तर्फे विधिज्ञ श्री. पी. बी .सावंत यांचेमार्फत–**

मी प्रस्तुतकामी एकुण ७ धनादेश दाखल केलेले आहेत. ते मला दाखविल्यास मी ते ओळखू शकतो. आता मी दाख्ला केलेले धनादेश मला दाखविण्यात आले. त्यापैकी अ.क्र.१ चा रु.७२,७८५/– रुपयांचा आहे. त्यावर आरोपीची सही आहे. सही ओळखण्याचे कारण म्हणजे सही माझे समक्ष केलेली आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. अ.क्र.२ चा रु. ७२,७८५/– रुपयांचा आहे. त्यावर आरोपीची सही आहे. सही ओळखण्याचे कारण म्हणजे सही माझे समक्ष केलेली आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. अ.क्र.३ चा रु. ७२,७८६/– रुपयांचा आहे. त्यावर आरोपीची सही आहे. सही ओळखण्याचे कारण म्हणजे सही माझे समक्ष केलेली आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. अ.क्र.४ चा रु. ७२,७८६/– रुपयांचा आहे. त्यावर आरोपीची सही आहे. सही ओळखण्याचे कारण म्हणजे सही माझे समक्ष केलेली आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. अ.क्र.५ चा रु. ७२,७८६/– रुपयांचा आहे. त्यावर आरोपीची सही आहे. सही ओळखण्याचे कारण म्हणजे सही माझे समक्ष केलेली आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. अ.क्र.६ चा रु. ७२,७८६/– रुपयांचा आहे. त्यावर आरोपीची सही आहे. सही ओळखण्याचे कारण म्हणजे सही माझे समक्ष केलेली आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे आणि अ.क्र.७ चा रु. ७२,७८६/– रुपयांचा आहे. त्यावर आरोपीची सही आहे. सही ओळखण्याचे कारण म्हणजे सही माझे समक्ष केलेली आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. अनुक्रमे **नि.१७** ते **नि.२३** देण्यात आली. मी प्रस्तुतचे चेक एच.डी.एफ.सी बँक सावंतवाडी

येथे हजर केले होते. मी प्रस्तुतकामी बँकेने दिलेला मेमो हजर केलेला आहे. तो मला दाखविल्यास मी तो ओळखू शकतो. आता मला सदरचा नि.४/८ वरील मेमो दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यास **नि.२४** देण्यात आली. मी प्रस्तुत कामी आरोपीला धनादेशाची रक्कम मागणी करणारी नोटीसची स्थळप्रत दाखल केलेली आहे. ती मला दाखवविल्यास मी ती ओळखू शकतो. आता मला स्थळ प्रत दाख्विण्यात आली. त्यावर माझी व माझ्या वकीलांची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. नोटीसच्या स्थळप्रतीस **नि.२५** देण्यात आली. मी प्रस्तुत कामी आरोपीला नोटीस पाठविल्याची पोस्टाकडील पावती व पोहोच पावती दाखल केली आहे. ती मला दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता नि.४/१० व ४/११ वरील मला पावती व पोहोच पावती दाखविण्यात आली. त्या त्याच आहेत. त्यास **नि.२६** व **नि.२७** देण्यात आली. मी प्रस्तुत कामी पोस्टाकडील मेमो दाखल केला आहे. तो मला दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला नि.४/१२ वरील मेमो दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यावर पोस्टाचा शिक्का व पोस्ट मास्तर यांची सही आहे. त्यास **नि.२८** देण्यात आली. मी प्रस्तुत कामी माझ्या व आरोपी यांचेमध्ये झालेला करारनामा दाखल केलेला आहे. तो मला दाखविल्यास मी तो ओळखू शकतो. सदरचा करार मला दाखविण्यात आला. सदरचा करार अॅड नोटरी श्री.सावंत यांचे समक्ष झालेला आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझा व आरोपीचा फोटो व सही आहे. मी सही ओळखण्याचे कारण म्हणजे ती माझ्या समक्ष केली आहे (as agreement produced is notarized document, hence his admissibility open for argument, exhibited only for identification purpose). आरोपीने माझे पैसे परत केलेले नाहीत. त्यामुळे त्यास शिक्षा मिळावी ही माझी विनंती आहे.

जादा सरतपास पूर्ण.
उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब ठेवणेत आला.

RANJANA GOVIND KUMBHAR
Digitally signed by RANJANA GOVIND KUMBHAR
Date: 2023.07.12 10:43:17 +0530

दि. ११/०७/२०२३

(श्रीमती आर.जी.कुंभार)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
सावंतवाडी.